१) सूर्य :-

जपाकुसुम संकाशं काश्यपेयं महाद्युतिम् । तमोरिं सर्वपापघ्नं प्रणतोस्मि दिवाकरम् ॥

जास्वंदीच्या फुलाप्रमाणे लाल अंगकांती असलेल्या, कश्यप ऋषींच्या वंशांत जन्मलेल्या अत्यंत तेजस्वी, अंधाराचा शत्रू, सर्व प्रकारची पापे नष्ट करणारा दिवसाच्या राजाला, सूर्याला मी नमस्कार करतो.

२) चंद्र :-

दधिशंखतुषाराभं क्षीरोदार्णव-संभवम् । नमामि शशिनं सोमं शंभोर्मुकुटभूषणम् ॥

दही आणि शंख यांच्या तुषारांप्रमाणे शोभून दिसणारा, क्षीरसागरांतून निर्माण झालेला, भगवान शंकराच्या डोक्यावर दागिन्यांप्रमाणे शोभणारा आणि ससा धारण केलेल्या सोमाला (चंद्राला) मी नमस्कार करतो.

३) मंगळ :-

धरणीगर्भ संभूतं विद्युत्कांति समप्रभम् । कुमारं शक्तिहस्तं च मंगलं प्रणमाम्यहम् ॥

धरणीच्या पोटांतून जन्म घेतलेल्या, विजेसारखी अंगकांती असलेल्या, हातात शक्ती हे शस्त्र धारण केलेल्या, कुमारस्वरूप अश्या त्या मंगळाला मी नमस्कार करतो.

४) बुध:-

प्रियंगुकलिकाश्यामं रूपेणाप्रतिमं बुधम् । सौम्यं सौम्यगुणोपेतं तं बुधं प्रणमाम्यहम् ॥

अशोकाच्या फुलाप्रमाणे लाल-श्यामल रंग असलेल्या, अति रूपवान, बुद्धिवंत, सोज्वळ, सरळमार्गी, सुस्वभावी बुधाला मी नमस्कार करतो.

५) गुरू :-

देवानांच ऋषीणांच गुरुं कांचनसन्निभम् । बुद्धिभूतं त्रिलोकेशं तं नमामि बृहस्पतिम् ॥

देवांचा आणि ऋषींचा गुरु, सोन्यासारखी अंगकांती असलेल्या, अति बुद्धिवंत, त्रिलोकांत श्रेष्ठ अशा त्या बृहस्पतीला (गुरूला) मी नमस्कार करतो.

६) शुक्र :-

हिमकुंद मृणालाभं दैत्यानां परम् । सर्वशास्र प्रवक्तारं भार्गवं प्रणमाम्यहम् ॥

हिमकमळाच्या देठाप्रमाणे प्रभा असलेल्या, दैत्यांचा गुरु असलेल्या, सर्व शास्त्रांचे ज्ञान असलेल्या, भृगुकुळांत जन्मलेल्या शुक्राला मी नमस्कार करतो.

७) शनी :-

नीलांजनसमाभासंरविपुत्रंयमाग्रजम् छायामार्तंड संभूतं तं नमामि शनैश्चरम् ॥

निळ्यारंगाची प्रभा असलेल्या, सूर्यपुत्र, यमाचा मोठा भाऊ असलेल्या, त्या शनैश्चराला (शनीला) मी नमस्कार करतो.

८) राहू :-

अर्धकायं महावीर्यं चंद्रादित्य विमर्दनम् । सिंहिकागर्भसंभूतं तं राहुं प्रणमाम्यहम् ॥

अर्धेच शरीर धारण केलेल्या, वीर्यवान, चंद्र-सूर्याला छळणार्या, सिंहीकेपासून जन्मलेल्या त्या राहूला मी नमस्कार करतो.

### ९) केतु :-

पलाशपुष्पसंकाशं तारकाग्रह मस्तकम् । रौद्रं रौद्रात्मकं घोरं तं केतुं प्रणमाम्यहम् ॥

पळसाच्या फुलाप्रमाणे लाल, तारका आणि ग्रहांमध्ये प्रमुख, भीती निर्माण करणार्या, रुद्राप्रमाणे तापदायक, अशा केतुलामीनमस्कारकरतो.इतिव्यासमुखोद्गीतंय:पठेत्सुसमाहित:।

दिवावायदिवारात्रौ विघ्नशांतिर्भविष्यति ॥